# डॉ.बाबासाहेब आंबेडकर; दलित साहित्य प्रवाहाच्या प्रेरणांचे भक्कम अधिष्ठान.

**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** मराठी विभाग प्रमुख.व प्र.प्राचार्य प्र.द्वा.कारखानीस कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबरनाथ (पू.), जि.ठाणे. ४२१५०१.(महाराष्ट्र) मेल आयडी- sandipan.navgire28@gmail.com फोन. ७२१८३७४२५१.

---

**गोषवारा :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील वांग्मयीन क्षेत्रांमध्ये ज्या वेगवान घडामोडी झाल्या त्याला व्यक्तिकर्तुत्व आणि कालकर्तृत्वाच्या गोष्टी कारणीभूत झाल्या होत्या. महाराष्ट्रात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये पुष्कळ मोठ्या प्रमाणात उलाडली झाल्या होत्या. वाङमयाच्या क्षेत्रात विशेषता: दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य,आदिवासी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य, ख्रिश्चन मराठी साहित्य असे वांग्मयीन प्रवाह साठोत्तर काळामध्ये दाखल झाले. हे प्रवाह म्हणजे एक प्रकारे वांग्मयीन चळवळीत होत्या. विशिष्ट विचारांची बांधिलकी पत्करून साहित्य क्षेत्रामध्ये दाखल झालेल्या या सर्व चळवळींच्या साहित्याने भारतासह जगभर साहित्यासह चर्चा पोहोचवली. त्यामध्ये दलित साहित्य प्रवाह अग्रणी होता. या साहित्य प्रवाहाचे वेगळेपण कशात आहे हे अनेक अभ्यासक व भाष्यकरांनी यथोचित पद्धतीने सांगितलेले आहे. या साहित्य निर्मितीच्या मुळाशी असणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित विचारधारा अधिष्ठान स्वरूपात उभी आहे, त्याचा शोध प्रस्तुत शोध निबंधामध्ये घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. डॉ. आंबेडकरांचा प्रत्यक्ष काळ , डॉ. आंबेडकरांचे कौटुंबिक जीवन, डॉ. आंबेडकरांच्या शिक्षण साधनेचा संघर्ष, डॉ. आंबेडकरांचे उच्च शिक्षण, 1970 दशकात सुरू झालेल्या दलित साहित्याच्या निर्मिती पाठीमागे असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असणारे योगदान लक्षात घेण्यासारखे आहे.

**कीवर्ड :**

१. १९७० च्या अगोदरच्या काळातील मराठी साहित्याची पार्श्वभूमी .

२. डॉ.आंबेडकरांचे एकूण साहित्य कला, कलावंत, लेखणीचे परिणाम याबाबतचे विचार.

३. दलित साहित्य प्रवाहाला मिळालेल्या डॉ.आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान.

४. दलित साहित्य चळवळीचे समर्थ टप्पे व मीमांसा.

५. दलित साहित्य चळवळीचा अन्य चळवळी वर पडलेला प्रभाव.

**प्रस्तावना :**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे भारतातील तमाम शोषित, पीडित, वंचित, तत्कालीन अस्पृश्य समाजाचे उद्धारकर्ते, थोर समाजसुधारक, श्रेष्ठ अर्थतज्ञ, आदर्श राजकारण, समाजकारण करणारे समर्थ पुढारी, बौद्ध धर्माची दीक्षा देणारे धर्मचिंतक, भारताच्या राज्यघटनेचे निर्माते, ज्येष्ठ कायदेतज्ञ,थोर संपादक अशा विविध अधिकार पदावर काम करून कोट्यावधी लोकांचे कल्याण करणारे महामानव म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे. ते ज्या तत्कालीन अस्पृश्य समाजात जन्माला आले त्यांचे जीवनात किती उपेक्षा, अपमान, गरीबी दारिद्र्य, यात सापडले होते त्यांचे प्रत्यक्ष अनुभवाधारित चटके सोसून त्यांनी स्वतःचे जीवन उच्च शिक्षणाने, मोठे संघर्षाने, कठोर परिश्रमाने बदलवून त्यांनी तमाम भारतीय समाजाचे जीवनही बदलण्यात त्यांना फार मोठे यश आले. त्यापैकीच आणखी एक क्षेत्र म्हणजे दलित साहित्य होय. या दलित साहित्य प्रवाहाच्या मुळाशी डॉ. आंबेडकरांचे समग्र जीवन व विचारकृतीचे संचित किती भक्कमपणे उभे होते हे सांगताना थोर समीक्षक डॉ. पंतावणे सर म्हणतात; " दलित साहित्याची प्रेरणा डॉ. आंबेडकर व त्यांचे तत्त्वज्ञान आहे. हा मूलभूत विचार सर्व अध्यक्षांनी निःसंदिग्धपणे मांडला आहे. हे मांडत असताना दलित साहित्याच्या प्रेरणा बाबत इतर कोणताही वाद होऊ नये, हे स्वच्छपणे नामदेव ढसाळ, सदा कराडे, वसंत मून, वामन होवाळ, ताराचंद खांडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त झाले आहेत!."१

डॉ. गंगाधर पानतावणे हे अस्मितादर्श या वांग्मयीन व दलित साहित्य चळवळीचे मुखपृष्ठ असलेल्या नियतकालिकाची वाटचाल पाहिली की, दलित साहित्य चळवलेला या अंकाने मोठाच हातभार लावला आहे. त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाच्या विचार मंचावरून केलेल्या अध्यक्षीय भाषणातील हा एक संदर्भ हेच कथन करतो की, दलित साहित्य चळवळीचा कणा हा आंबेडकरी विचार व तत्त्वज्ञानावर कणखरपणे उभा आहे. यात दुमत असण्याचे कारण नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. दलित साहित्याच्या उदयापूर्वीची स्थिती गतीचा परिचय करून देणे.

२. दलित साहित्याच्या उदया नंतरची स्थिती गती जाणून घेणे.

३. दलित साहित्याने नेमके काय दिले याची चर्चा करणे.

४. दलित साहित्य व इतर साहित्य प्रवाह यांच्या संबंधाची बाजू पाहणे.

५. दलित साहित्याची वांग्मयीन व जीवनविषयक दृष्टी पाहणे.

**संशोधनाची पद्धती :**

सदर शोध कार्यासाठी विशिष्ट लेखकाचा अभ्यास, तुलनात्मक अभ्यास पद्धती व समाजशास्त्रीय अभ्यास पद्धतीचा आवश्यक तिथे उपयोग करून डॉ.आंबेडकरांच्या प्रेरणांमुळे दलित साहित्य प्रवाहाची जडणघडण व प्रवास कसा झाला याची काही आवश्यक संदर्भस्थळे पाहण्यासाठी उपयोग केला आहे.

**विस्तार :**

खरे तर मराठी साहित्याचे अभ्यासाच्या सोयीसाठी पडलेले कालखंड पाहिले की, मध्ययुगीन, अर्वाचीन व आधुनिक कालखंडात दलित जाणिवांचे म्हणावी तशी ठळक चित्रणे जवळपास चित्रित झाली नाहीतच असे म्हटले तरी चालेल. अपवाद म्हणून चोखा मेळा, कर्ममेळा (मध्ययुगीन काळ), महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, किसन फागु बनसोडे, मुक्ता साळवे(अर्वाचीन काळ)डॉ. आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, श्री.म. माटे, व्यंकटेश माडगूळकर(आधुनिक काळ) यांचे संदर्भ वजा केले तर प्राधान्याची दलित चित्रणे नाहीतच. याची कारणे अनेक आहेत. मुळात लिहिणारा वर्गच प्रस्थापित समाजातील होता. त्यांचे प्रश्न वेगळे होते. पारंपरिक अस्पृश्यतेमुळे त्या काळात एक तर दलितांच्या जीवनाबद्दल कोणी कळवल्याने लिहिण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. जातीवर्ण व्यवस्थेच्या पगड्यामुळे, दबावामुळे दलितांच्या समस्यावरील अपवादात्मक चित्रण वगळता इतर कोणीही लोकांनी लक्षात आणले नाही ही खरी वस्तुस्थिती आहे. पुढे म.फुले, डॉ.आंबेडकर, राजर्षी शाहू महाराजांच्या विचारामुळे तत्कालीन महाराष्ट्रात जे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक ,साहित्यिक, राजकीय बदल व सुधारणांचे सत्र सुरू झाले, त्याचे परिणाम जाणवायला लागले होते. शिक्षणाचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, समतेचा, बंधुतेचा, न्यायाचा अधिकार, हस्तगत करण्यासाठी आंदोलने, सभा, परिषदा, विनंती अर्ज, चळवळी यांच्या माध्यमातून स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंतच्या काळात जो न्याय्य हक्कांचा विचार अधोरेखित होत गेला. त्याला इंग्रजी राजवटीचे दृश्य अदृश्य स्वरूपामध्ये मूक संमती मिळत गेली. त्यामुळे दलित साहित्यात नव्या विचारांचे वारे वेगाने वाहू लागले. "आंबेडकर विचार हा मानवी स्वातंत्र्याचा उद्गार आहे. जगात जेथे जेथे सामाजिक गुलामगिरी व पारतंत्र्य आहे तिथे तिथे हा विचार एखाद्या झंझावातासारखा येतो. आंबेडकर विचार पोतीनिष्ठा नाकरतो आणि बुद्धीप्रामाण्यावर भर देतो. आंबेडकर विचार विभूती पूजा नाकारतो व विज्ञाननिष्ठता स्वीकारतो!."२ या डॉ.मनोहर जाधव यांच्या ग्रंथातील विधानात दलित साहित्याच्या आगमनानंतरची बदललेली स्थितीगती ठळकपणे अधोरेखित होते. या बदललेल्या सर्वंकष परिस्थितीमुळे दलित साहित्याने नेमके काय साधले ? या प्रश्नाचे उत्तर यानिमित्ताने शोधणे मोठे समर्पक ठरेल.स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये म्हणजे १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूर प्रांती असणाऱ्या सध्याच्या दीक्षाभूमीवर जे धर्मांतर केले होते त्या घटनेचे पडसाद भारतासह जगभर उमटले. हिंदू धर्म नाकारून जो बौद्ध धर्म जाहीररित्या लाखो शोषित, वंचित ,पीडित लोकांना दिला; त्याचा परिणाम शहरापासून गाव खेड्यात राहणाऱ्या परिवर्तनवादी विचार करणाऱ्या, जगू पाहणाऱ्या अस्पृश्य समाजावर फार मोठ्या प्रमाणात झाला. तो विषय त्यांना मोठ्या आस्थेचा वाटू लागला. गावगाड्याच्या शोषणाच्या चक्रातून या धर्मांतराने सुटका केली. वर्चस्वाचे ओझे झिडकारून अस्तित्वाच्या अडेंटिटीचा विचार प्रबळ होऊ लागला. आम्हीही माणसं आहोत, आम्हालाही सर्व अधिकार आहेत, न्यायपूर्ण जगणे हा एक आमचा अधिकार आहे. याची जाणीव तीव्रतेने प्रसारित झाली. या सर्व विचारांना आपल्या काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक भाषणे, लेख, संवाद यासारख्या माध्यमातून बहुजन समाजाप्रती बहुजन समाजातील ग्रंथकारांनी या विचारांचे मोठेच रान पेटवले. जागृतीची मशाल हाती घेतली. कल्याणकारी धर्म कोणता? हा विचार निश्चितच झाला. धर्म हे ओझे नाही तो एक सुलभ जीवनशैलीचा मार्ग आहे हा विचार पटत गेला. १९६० नंतरच्या काळात आलेल्या दलित साहित्याच्या प्रवाहाने तमाम वंचित समाजाच्या समस्या, प्रश्न ,अडचणी जाहीर स्वरूपामध्ये मांडल्या. त्यामुळे भूप्रदेश निहाय लोकांच्या जीवन संघर्षाचे नव नवे आयाम मराठी साहित्याला लक्षात आणून दिले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांच्या मागण्यांचा मसुदाच आपल्या लेखनातून साकारला. कानाकोपऱ्यात राहणाऱ्या सामान्य जनतेला दलित साहित्याने स्वतःचा आवाज दिला. "साहित्यनिष्ठा बाळगणारा कलावंत साहित्याच्या प्रांतात समान असतो. कारण साहित्यनिर्मिती हेच त्याचे ध्येय असते. मशिदीत येणारा प्रत्येक माणूस माणूस असतो; त्याप्रमाणे साहित्याच्या प्रांतात प्रवेश करणारा प्रत्येक कलावंत समान असतो. आपण स्वतःला बंडखोर म्हटले पाहिजे. मी आपणाला आंबेडकर कुलाचा वारसा सांगणारे क्रांतीप्रवण रचनाकार मानतो!."४ हे एका अध्यक्षपदावरून केलेल्या डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या भाषणातील उद्गार दलित साहित्याने काय साधावयाचे आहे? काय साध्य केले आहे? याचे उचित मूल्यमापन या भाषणात दिसून येते. अशा या दलित साहित्याच्या प्रचार प्रसाराचा परिणाम इतक्या वायू वेगाने झाला की, या साहित्य प्रवाहाच्या साहित्य विषयाला व जीवन विषयक दृष्टिकोनाचा परिणाम पुढे आलेल्या १९७५ नंतरच्या काळातील ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन मराठी साहित्य यासारख्या साहित्य प्रवाहांवर निश्चितच पडला आहे. डॉ.आंबेडकरांचा विचार शोषणमुक्त समाजाच्या आत्मसन्मानाचा व बंधुत्व केंद्रभूत असणारा विचार असल्याने पुढील साहित्य प्रवाहांनी या विचाराला स्वीकारून आपली वाटचाल केल्याचे दिसून येते. त्यामुळे दलित साहित्य व अन्य प्रवाहांचे नाते समविचारी साहित्याच्या नात्यात दृढ झाल्याचे दिसून येते. या शोध विचारशंखलेत असे दिसून येते की,दलित साहित्यात वांग्मयीन व जीवन विषयक जो दृष्टिकोन उतरला आहे; तो विचार खरे तर आंबेडकरांचेच वैचारिक धन आहे. कलावंताचे सामाजिक बांधिलकीचे जगणे हे जीवनवादी विचाराला कणखर बळकटी देणारा, प्रदान करणारा ठरला. डॉ. आंबेडकरांना साहित्य लेखनाची ताकद पुरती कळली होती. साहित्य लेखणी मध्ये एक दुर्दम्य ध्येयासक्ती असते. हे विधान सर्व समतावादी परिवर्तनवादी ग्रंथकारांच्या लेखकांच्या बाबतीत सत्य कथन करणारे विधान आहे. दलित साहित्याच्या दिसणे असण्याबाबत अनेक थोर अभ्यासकांनी आपली मते मांडलेली आहेत. म.भि.चिटणीसांना दलित साहित्य हे 'अस्मिता आणि आदर्श' वाटते. केशव मेश्रामांना ते 'सांस्कृतिक उत्थान' वाटते. डॉ.जनार्दन वाघमारे यांना 'आशयगर्भ विद्रोह' वाटतो. डॉ.कुमोद पावडे यांना 'समूहाचा उच्चार' म्हणजे दलित साहित्य वाटते. बंधूमाधव यांना 'क्रांतिकारी प्रेरणांचा शोध' म्हणजे दलित साहित्य असे वाटते. वसंत मून यांना 'परंपरा नाकारणारे वांग्मय' वाटते. दया पवारांना 'नव्या मुक्तीची पहाट' वाटते. नामदेव ढसाळ यांना 'नवनवी आव्हाने घेणारे' साहित्यविश्व म्हणजे दलित साहित्य वाटते. भालचंद्र फडके यांना 'परिवर्तनाची बांधिलकी स्वीकारणारे' साहित्य वाटते. निर्मलकुमार फडकुले यांना 'आत्मशोधाचा हुंकार' दलित साहित्यात सापडतो. तर फ. मु. शिंदे यांना 'संघर्षाचा धर्म' म्हणून दलित साहित्य दिसते. लक्ष्मण मानेना 'मनुष्यत्व नाकारलेल्या जनतेचे खरं साहित्य' म्हणजे दलित साहित्य वाटते. डॉ. सदा कराडे यांनी 'जीवनवादी साहित्य' असे दलित साहित्याला नाव दिले आहे. डॉ. सदा कराडे यांनी दलित साहित्य हे विद्रोही आहे परंतु जीवनवादी आहे. प्रस्थापित

साहित्याला छेद देणारे आहे. क्रांतीचा विचार जसा जीवनाच्या अंगाने येतो, तसा विद्रोह सुद्धा जीवनाच्या अंगाने येतो. दलित साहित्यात हा असा दिशादर्शक विचार मांडला आहे. हा विचार येण्यापाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे तत्त्वज्ञान मोठे भक्कमपनाने अधिष्ठित आहे. डॉ. आंबेडकरांची व्यक्ती, समाज, राष्ट्र याकडे बघण्याची जी जीवनवादी दृष्टी आहे तीच दृष्टी साहित्य विश्वाकडे पाहण्याची आहे. साहित्य कला ही प्रभावी कला आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणूनच विदर्भ साहित्य संघाच्या निमंत्रणावरून ते लेखकवर्गाशी बोलताना केलेल्या भाषणाचा रोख जीवनवादाचाच अंगुलीनिर्देश करतो. डॉ. आंबेडकर म्हणतात; " माझे साहित्यिकांना आग्रहाचे आवर्जून सांगणे आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून अविष्कृत करा. आपले लक्ष आकुंचित मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपूर्ती ठेवू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखनी आपल्या प्रश्नापूर्तीच बंदिस्त ठेवू नका. तिचे तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे, दुःखितांचे फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचं दुःख त्यांची व्यथा नीट समजून घ्या, आणि आपल्या साहित्य प्रकाराद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी झटा. त्यातच खरी मानवता आहे!."५ हा विचार दलित साहित्य शिरोधार्य पद्धतीने स्वीकारून आजही वाटचाल करते आहे. यावरून काही अंतिम निष्कर्ष काढता येतील ते असे-

**निष्कर्ष :**

१. दलित साहित्य चळवळीच्या मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान प्रबळ प्रेरणा स्रोत म्हणून उभे आहे.

२. डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानात मानवता धर्म हा महत्त्वाचा ठरतो.

३. दलित साहित्याने विद्रोहाची मिसाल उभी केली ती प्रस्थापितांना नाकारून विस्थापितांना एकत्र आणण्यासाठी.

४. स्वातंत्र्य, समता, बंधुता,न्याय या मूल्यांची रक्षण करण्यासाठी जबाबदारी प्रत्येक माणसाकडे जाते.

५.डॉ. आंबेडकरांचे जीवन विचाराचे सूत्र वैश्विकता गाठते. समतामूलक स्तरावरची नवसमाज रचना ही विचारसरणी डॉ. आंबेडकर व दलित साहित्य प्रवाहाला अपेक्षित आहे.

६. दलित साहित्याने जाती वर्ण व्यवस्थेची उतरंड नाकारली ती नाकारण्याची देणगी डॉ. आंबेडकरांचीच होती.

७. मराठी साहित्य विश्वाला सर्व स्तरावरची व्यापकता, विविधता, वैश्विकता दलित साहित्याने बहाल केली.

**समारोप :**

दलित साहित्य प्रवाहाच्या प्रेरणांचा मागोवा घेत असताना प्रस्तु शोधनिबंधात आपण दलित साहित्य निर्मिती मागे डॉ. आंबेडकरांचे एकूण तत्त्वज्ञानच कशा प्रकारे मुख्यत: प्रेरणास्थानी होते हा विचार केंद्रवर्ती ठेवून विचार केला आहे. खरे तर देशकाल परिस्थिती, व्यक्तिकर्तृत्व , कालकर्तृत्व , स्वातंत्र्यप्राप्तीची घटना, अशा अनेक घटनांचा उल्लेख प्रेरणांच्या यादीमध्ये ढकलून देण्याचा प्रयत्न काही अभ्यास म्हणवणाऱ्या मराठीतील लोकांनी केला आहे, पण त्यात एकांगीपणा आढळून येतो. या सगळ्यांवर मात करून दलित साहित्यिक संशोधक अभ्यासक व दलितेतर समीक्षक, संशोधक यांनी अभ्यासाअंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच एकमेव दलित साहित्याच्या साहित्य प्रवाहाच्या निर्मिती पाठीमागे असणाऱ्या प्रेरणेच्या मुळाशी असल्याचे सर्वमान्य झाले आहे. १९७० च्या दशकामध्येच या बाबतीत एकमत झाले होते. 'दलित साहित्य हे सामाजिक क्रांतीविज्ञान आहे'. असे थोर साहित्यिक बाबुराव बागुल यांचे मत होते. जगाच्या पाठीवर असा एक भारत देश आहे की , या भारतात अठरापगड जाती, विविध धर्म , पंथ , विचारधारा , परंपरा यांची भरमसाठ भरमार असलेला देश आहे. शिवाय या देशात हजारो वर्षापासून चातुर्वर्ण्य व्यवस्था राबवली जात होती; पण ब्रिटिश भारतात आल्यानंतर या व्यवस्थेची पहिली चिकित्सा महात्मा फुले यांनी केली. मुठभर लोक हे बहुसंख्य लोकांना देव, धर्माच्या, भक्तीच्या, पाप पुण्याच्या , पुनर्जन्माच्या आडून कसे लुबाडतात, फसवतात,शोषण करतात हे त्यांच्या ग्रंथरचना व प्रत्यक्ष कृती कार्यातून सिद्ध केलेले आहे. हे इतिहासात दर्ज झालेली ही घटना डॉ. आंबेडकरांच्या शोधक नजरेतून कशी सुटेल. अस्पृश्यवर्ग व तमाम स्त्रीवर्गाचा उद्धार करणाऱ्या ज्योतिबा फुले यांना डॉ. आंबेडकरांनी गुरुस्थानी मानले आणि त्यांच्या कार्याला आपले जीवनकार्य समजून आयुष्य वेचले. त्यांच्यानंतर त्यांचे हे मानवतावादी चळवळीचे कार्य दलित साहित्य चळवळीने शिरावर घेतले. आजतागायत हा विचार सबंध भारतवर्षात चळवळीच्या नावाने वारसा स्वरूपात पुढे चालविला जात आहे. डॉ. आंबेडकरांचे कार्यकर्तृत्वाचे योगदान केवळ शोषित, पीडित, वंचित समाजापुरते मर्यादित नाही तर ते भारतासह जगभराच्या परिसरात असणाऱ्या आपल्या मानवी जगाला,समूहाला वरदान ठरेल असेच आहे. म्हणून तर त्यांना आपण महामानव म्हणून ओळखतो. समजतो.

**संदर्भ साधनांची सूची.**

१. पानतावणे, गंगाधर; 'दलित साहित्य चर्चा आणि चिंतन' , साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३, पृष्ठ, ३२-३३.

२.जाधव, मनोहर; 'साहित्य शोध आणि संवाद' , सुविद्या प्रकाशन , पुणे , २०००,पृष्ठ ३३.

३.जाधव, मनोहर; 'साहित्य शोध आणि संवाद', सुविद्या प्रकाशन, पुणे, २०००, पृष्ठ २८-२९.

४. पानतावणे, गंगाधर; 'दलित साहित्य चर्चा आणि चिंतन' , साकेत प्रकाशन , औरंगाबाद, १९९३, पृष्ठ , २२०.

५.किरवले, कृष्णा; 'दलित चळवळ आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६, पृष्ठ, १०९-११०.